| सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन / राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन | महाराष्ट्र शासन<br>सार्वजनिक आरोग्य विभाग<br>जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ<br>कुडाळ तहशिलदार कार्यालय समोर, तालुका कुडाळ,<br>जिल्हा सिंधुदुर्ग, पिन कोड नं. ४१६ ५२० | सत्यमेव जयते<br>Government of Gujarat |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक (०२३६२)-२९९४३४ | Email Address :- dwchsindhudurg@gmail.com | |
| बेटी बचाव, बेटी पढाव | कागद वाचवा, वृक्ष वाचवा | |

जा.क्रं./जिमबालरुकु/भांडार/Commercial RO/ 2031 /२०२६
दिनांक :- १५/०७/२०२६

## दरपत्रक जाहिर सूचना

विषय :- जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या रुग्णालयातील पिण्याच्या पाण्याचा वॉटर कूलरसाठी Commercial RO Plant खरेदी करण्यासाठी दरपत्रक मागविण्याबाबत..

संदर्भ :- शासन निर्णय उदयोग उर्जा व कामगार विभाग क्रं. भा.ख.स. २०१४/प्र.क्रं.८२/भ/उदयोग ४ दिनांक ०१/१२/२०१६

आपण्यास कळविण्यात येते की उपरोक्त संदर्भ क्रं. १ शासन निर्णयातील ३.२.३ मधील तरतूदी प्रमाणे या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर कूलर बसवण्यात आला असून सदरील वॉटर कूलरसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता Commercial RO Plant खरेदी करण्यासाठी इच्छुक पुरवठादार यासंकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

### तक्ता - ०१

Scope - Supply, Installation, Commissioning and Prove Out of Commercial RO Plant as per detailed specification -

| अ.क्रं. | मशीनचा तपशील | संख्या | किमंत |
|---|---|---|---|
| १ | Commercial RO Plant - २५ LPH<br>Key Technical Specifications -<br>१. Purification Capacity - २५ +/- ५ Liters Per Hour (Up to २५०-३०० liters per day)<br>२. Filter Stages - Multi-stage purification typically consisting of Spun/Sediment Filters, Granular | ०१ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | Activated Carbon (GAC), RO Membranes (typically ૨ x ૮૦ GPD or ૧૦૦ GPD) and Post Carbon / TDS Adjuster.<br>૩. Input TDS - Handles raw water Total dissolved Solids up to ૨૦૦૦ PPM.<br>૪. TDS Rejection - Up to ૯૫%<br>૫. Max Duty Cycle - ૧૫૦ to ૩૦૦ Liters / Day depending on the model.<br>૬. Electrical Requirements - Operating voltage of ૨૪V-૪૮V DC via heavy duty SMPS adapters with input power support of ૧૬૦-૩૦૦V AC.<br>૭. Booster Pump - ૧૦૦ GPD to ૨૦૦ GPD heavy duty booster pump.<br>૮. Material of Construction (MOC) - Food-grade ABS plastic housing or stainless Steel (SS) skid.<br>૯. Inlet Pressure - Minimum ૦.૩ kg/sq cm; Maximum ૨ kg/sq cm.<br>૧૦. Warranty - ૦૧ Year or more | | |
| ૨ | Commercial RO Plant - ૫૦ LPH<br>Key Technical Specifications -<br>૧. Purification Capacity - ૫૦ +/- ૧૦ Liters Per Hour<br>૨. Filter Stages - Multi-stage purification typically consisting of Sediment, Pre-Carbon, RO, UF, Post-Carbon, TDS Minimiser.<br>૩. Input TDS - Handles raw water Total dissolved Solids up to ૨૦૦૦-૩૦૦૦ PPM.<br>૪. TDS Rejection - Up to ૯૫%<br>૫. Max Duty Cycle - ૪૦૦ to ૫૦૦ Liters / Day depending on the model.<br>૬. Electrical Requirements - Operating voltage of ૨૪V-૪૮V DC via heavy duty SMPS adapters with input power support of ૧૬૦-૩૦૦V AC.<br>૭. Booster Pump - ૧૦૦ GPD to ૨૦૦ GPD heavy duty booster pump. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ८. Material of Construction (MOC) - Food-grade ABS plastic housing or stainless Steel (SS) skid.<br>९. Warranty - ०१ Year or more | | |

तरी मान्यता प्राप्त व इच्छुक स्थानिक पुरवठादारांनी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक दिनांक २०/०७/२०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपर्यत या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या संस्थेच्या लेटर हेडवर सदरील अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र सादर केल्याशिवाय आपले दरपत्रक विचारात येतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. दरपत्रक भरण्यापूर्वी खालील सूचना, अटी व शर्ती काळजी पूर्वक वाचाव्यात.

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. शासकीय सुट्टीचा दिवस वगळता दिनांक १३/०७/२०२६ ते दिनांक २०/०७/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत आणी दिनांक दिनांक २०/०७/२०२६ रोजी सांयकाळी ४.३० वाजेपर्यत लिफाफा बंद दरपत्रके स्विकारण्यात येतील. टपालाने अथवा कुरीयर सेवेमार्फत पाठवलेले दरपत्रक विलंबाने प्राप्त झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.
२. दिनांक २१/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ यांच्या दालनात खरेदी समितीच्या समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील. इच्छुक दरपत्रकधारक किंवा त्यांचा अधिकृत पत्र असलेला प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची अनुमती आहे.
३. लिफाफ्यावर **"Quotation require for purchasing Commercial RO Plant"** असा उल्लेख करावा.
४. दरपत्रक **"मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ"** या नावाने सादर करावे.
५. दर सुवाच्य अक्षरात व अंकात नमूद करावे, खाडाखोड असलेले दरपत्रकच विचारात घेतले जाणार नाही. सर्व दर करासहित सादर करावेत. दरपत्रक सादर करतेवेळी अनुज्ञेय असलेले सर्व शासकीय कर विचारात घेऊन दरपत्रक भरावे. तसेच करार वैध असेपर्यत दरामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येणार नाही. दरपत्रकात नमूद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.
६. अटी व शर्तीसह असलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
७. नमूद दर हे सर्व प्रकारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोच करावयाच्या वाहतूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरीक्त अन्य कोणतेही दर अदा केले जाणार नाही.
८. दरपत्रके ही संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावीत. तसेच नमूना प्रपत्रामध्ये दर नमूद करुन सही व शिक्का सह सादर करावीत.

९. पुरवठादाराने दरपत्रकासोबत खालील कागदपत्राच्या स्वंसाक्षांकित प्रत जोडावे -

   १. संस्था नोंदणी प्रमाणपत्र अथवा शॉप ॲक्ट लायसन्स
   २. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र
   ३. जी एस टी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
   ४. पॅन कार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत
   ५. बॅक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स

१०. कराराच्या सर्व अटी व शर्तीनुसार वस्तूची खात्री झाल्यानंतरच व अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल. कोणत्याही स्वरुपात देयकाची आगाऊ रोख रक्कम मिळणार नाही. तसेच देयाकाची अदायगी RTGS/NEFT/PFMS पध्दतीनेच करण्यात येईल.

११. ज्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार पुरवठा दिलेल्या कालावधीत करणे बंधनकारक राहिल.

१२. साहित्याचा दर्जा हा उत्कृष्ट असावा. दरपत्रक स्वीकृत झाल्यापासून सात दिवसात पुरवठा करावयाचा आहे.

१३. पुरवठातील अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१४. दरपत्रक मंजुर झाल्यानंतर पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच कोणतीही पूर्व सूचनेशिवाय दरकरार रद्द करण्यात येईल आणी मंजुर पुरवठादाराचे नाव काळया यादीत घालण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१५. कोणतेही संपूर्ण दरपत्रक किंवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कारण न दर्शवता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच खरेदी करावयाच्या साहित्यात आवश्यकते प्रमाणे बद्दल करण्याचा अंतिम अधिकार वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ यांनी राखून ठेवलेला आहे.

Dist. Women & Child Hospital * Sindhudurg - Kudal. * सत्यमेव जयते

वैद्यकिय अधिक्षक, वर्ग-१
जिल्हा महिला व बाल रुग्णालय
सिंधुदुर्ग - कुडाळ

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावें

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करतो की मी / आम्ही वर नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करण्यात आले तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ: -

दिनांक: -

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नाव: -

पत्ता: -

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावें

## निविदाकाराचे हमीपत्र

मी / आम्ही ____________________________________________या हमीपत्राद्वारे लिहून देतो की, दरपत्रक मागविणाऱ्या खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबध नसुन हितसंबधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधीकाऱ्याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असून दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन दरपत्रक भरलेले नाही, असे आढळून आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक :

ठिकाण :

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावें

# स्वघोषणापत्र

(१) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,या दरपत्रकामध्ये किमान मुल्यापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत.या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवयाय काळयायादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा जिल्हा शल्य चिकित्सक,सिंधुदुर्ग किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था या मध्ये कोणतेही नाते वा हितसंबध नाहीत.

(२) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे जीएसटी - वस्तु व सेवा कर याची नोंदणी झालेली असुन वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर परतावा नियमित भरणेत येतो.

(३) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेवुन इतर खोडावे.

स्थळ -

दिनांक -

नाव, सही, रबरी शिक्का